९८ वा
वार्षिक अहवाल
सन २०१८-१९

Web Site : **rajapururbanbank.com**




झेप शतक महोत्सवाकडे

प्रगतीपथावरील वाटचालीची

सांघिक प्रगतीची
९८ वर्षे
सन १९२१-२०१९

स्थापना : १/१०/१९२१ नोंदणी क्र. : ३६३३

# राजापूर अर्बन

## को-ऑप.बँक लि.,राजापूर (रत्नागिरी)

राजापूर अर्बन को.ऑप. बँक लि. राजापूर
सहकारे वसते लक्ष्मी

Small Steps To Bright Future

# राजापूर अर्बन को-ऑप. बँक लि.राजापूर

## विद्यमान संचालक मंडळ



**श्री.संजय पां.ओगले**
अध्यक्ष



**श्री.अनिल श्री.करंगुटकर**
उपाध्यक्ष



श्री.जयंत ह.अभ्यंकर
संचालक



श्री.हनिफ मु.काझी
संचालक



श्री.राजेंद्र श्री.कुशे
संचालक



सौ.अनामिका सौ.जाधव
संचालिका



श्री.सुनिल भि.जाधव
संचालक



श्री.अ.रज्जाक अ.अ.डोसानी
संचालक



श्री.विजय श्री.पाध्ये
संचालक



सौ.धनश्री द.मोरे
संचालिका



श्री.प्रसाद ना.मोहरकर
संचालक



श्री.इब्राहिम ग.बलबले
संचालक



श्री.सुरेश द.गवस
तज्ञ संचालक



श्री.ॲड.शशिकांत ग.सुतार
तज्ञ संचालक



श्री.रमेश भै.काळे
कर्मचारी प्रतिनिधी



श्री.दिलीप भा.दिवटे
कर्मचारी प्रतिनिधी



श्री.शेखरकुमार उ.अहिरे
कार्यकारी संचालक

मुख्य कार्यालय : 'दि रॉयल प्लाझा', पहिला मजला, मुंबई-गोवा हायवे, राजापूर
एस.टी.डेपो समोर, पो.ता.राजापूर, जि.रत्नागिरी, पिन नं.-४१६ ७०२
फोन नं. (०२३५३) २२२४५१, २२२६५१ फॅक्स नं. (०२३५३) २२२८५१
Customer Care No. : 7798326622 ● Website : rajapururbanbank.com
Balance Enquiry Missed Call Dail No.8432601111
Email : rjpurban@rediffmail.com / rjpurban@yahoo.co.in

## शाखा

**रत्नागिरी जिल्हा**

| | | |
|---|---|---|
| १) | राजापूर | फोन नं. ०२३५३-२२२०५१ |
| २) | साखरी नाटे | फोन नं. ०२३५३-२२५२२१ |
| ३) | पाचल | फोन नं. ०२३५३-२२३३२४ |
| ४) | लांजा | फोन नं. ०२३५१-२३०८५१ |
| ५) | रत्नागिरी (मारूती मंदिर) | फोन नं. ०२३५२-२२७५५१ |
| ६) | देवरूख | फोन नं. ०२३५४-२६१८५१ |
| ७) | जानशी पठार (मिठगवाणे) | फोन नं. ०२३५३-२३७६२५ |

**सिंधुदुर्ग जिल्हा**

| | | |
|---|---|---|
| ८) | वैभववाडी | फोन नं. ०२३६७-२३७४५१ |
| ९) | कुडाळ | फोन नं. ०२३६२-२२४५५१ |
| १०) | पडेल | फोन नं. ०२३६४-२२५३५१ |

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया लायसन्स : युबीडी-एमएच-६०८ पी दि.२०/१०/१९८६**

## विद्यमान संचालक मंडळ

**श्री.संजय पांडुरंग ओगले**
अध्यक्ष

**श्री.अनिलकुमार श्रीधर करंगुटकर**
उपाध्यक्ष

१) **श्री.जयंत हणमंत अभ्यंकर** - संचालक, २) **श्री.हनिफ मुसा काझी** - संचालक, ३) **श्री.राजेंद्र श्रीराम कुशे** - संचालक, ४) **सौ.अनामिका सौरभ जाधव** - संचालिका (महिला प्रतिनिधी), ५) **श्री.सुनिल भिकाजी जाधव** - संचालक (अनुसूचित जाती/जमाती), ६) **श्री.अ. रज्जाक अ. अजीज डोसानी** - संचालक, ७) **श्री.विजय श्रीराम पाध्ये** - संचालक, ८) **सौ.धनश्री दत्ताराम मोरे** - संचालिका (महिला प्रतिनिधी), ९) **श्री.प्रसाद नारायण मोहरकर** - संचालक (भटक्या विमुक्त जाती/जमाती/विशेष मागास प्रवर्ग) १०) **श्री.इब्राहिम गफार बलबले** - संचालक, ११) **श्री.सुरेश दत्ताराम गवस** - संचालक (स्विकृत/तज्ञ), १२) **ॲड.श्री.शशिकांत गणपत सुतार** - संचालक (स्विकृत/तज्ञ), १३) **श्री.रमेश भैरू काळे** - कर्मचारी प्रतिनिधी, १४) **श्री.दिलीप भालचंद्र दिवटे** - कर्मचारी प्रतिनिधी, १५) **श्री.शेखरकुमार उत्तम अहिरे** - (कार्यकारी संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी)

## • परिशिष्ट ''अ'' •

१) बँकेचे नाव :- राजापूर अर्बन को-ऑप.बँक लि.राजापूर (रत्नागिरी)
२) बँकेचा पत्ता :- मुख्य कार्यालय : 'दि रॉयल प्लाझा', पहिला मजला, मुंबई-गोवा हायवे, राजापूर एस.टी.डेपो समोर,पो.ता.राजापूर, जि.रत्नागिरी : ४१६ ७०२
३) बँकेची नोंदणी तारीख व नंबर :- रजि.नं.३६३३, दि.०१/१०/१९२१
४) रिझर्व्ह बँकेकडून मिळालेला परवाना नंबर व तारीख :- UBD/MH-608 P दिनांक २०-१०-१९८६
५) कार्यक्षेत्र :- संपूर्ण महाराष्ट्र राज्य

## • ३१ मार्च २०१९ ची आर्थिक स्थिती •

(रूपये लाखात)

| अ.क्र. | तपशील | | | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | शाखांची संख्या - मुख्य कार्यालयासहित | | १० + १ = ११ | |
| २ | सभासद संख्या - | कायम | २२,७४९ | |
| | | नाममात्र | २,९५७ | |
| ३ | भांडवल - | अधिकृत | | १,०००.०० |
| | | वसूल | | ५०७.४७ |
| ४ | निधी राखीव व इतर | | | १,१९५.९२ |
| ५ | ठेवी | | | २१,९५४.११ |
| | | बचत ठेवी | ६,१०३.७५ | |
| | | चालू ठेवी | ३५८.७४ | |
| | | मुदत ठेवी | १४,८१९.७९ | |
| | | इतर ठेवी | ६७१.८३ | |
| ६ | कर्जे | | | १३,०९५.१७ |
| | | तारण युक्त | १२,८४५.९३ | |
| | | विनातारण | २४९.२४ | |
| | | थकबाकी प्रमाण | १.८६% | |
| | अग्रक्रम कर्जाचे एकूण कर्जाशी प्रमाण | | ६९.५०% | |
| | दुर्बल घटकाचे एकूण कर्जाशी प्रमाण | | ३९.००% | |
| ७ | गुंतवणूक | | | ८,८००.६८ |
| | चालू वर्षाचा नफा | | | १२६.८९ |
| | ऑडिट वर्ग | | ''अ'' | |
| | एकूण कर्मचारी वर्ग - अधिकारी वर्ग | | १५ | |
| | इतर | | ३२ | ४७ |
| ८ | बाहेरील कर्जे | | | ०.०० |
| ९ | खेळते भांडवल | | | २४,१०४.८३ |

# नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

या बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की,

बँकेची सन २०१८-१९ ची ९८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि.१५ सप्टेंबर २०१९ रोजी सकाळी ठीक ९.३० वाजता 'नगरवाचनालय हॉल', राजापूर, मेनरोड, राजापूर** येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी भरणार आहे. तरी आपण सभेला वेळेवर उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

## • सभेपुढील विषय •

१) मागील सभा दिनांक ०९ सप्टेंबर २०१८ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०१८-२०१९ सालचा अहवाल, ताळेबंद व नफातोटापत्रक स्विकृत करणे.
३) सन २०१८-२०१९ सालच्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चाला मंजूरी देणे.
४) कायदा व नियम यांस अनुसरून सन २०१८-१९ सालचे नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.
५) सन २०१८-२०१९ चा शासकिय लेखापरिक्षक यांचा अहवाल/दोष दुरूस्ती अहवाल वाचून नोंद घेणे.
६) सन २०१९-२०२० सालचे मा.संचालक मंडळाने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे व प्रगतीदर्शक तक्त्याची माहिती देणे.
७) सन २०१९-२०२० सालाकरीता वैधानिक लेखापरिक्षक यांची नेमणूक करणे.
८) सन २०१९-२०२० सालाकरीता कंकरंट/अंतर्गत हिशोब तपासणीसाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
९) सभासदांकडून आलेल्या लेखी प्रश्नांची उत्तरे वाचून त्यांची नोंद घेणे.
१०) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत (Condone) करणे.
११) मा.अध्यक्ष महाशय यांचे परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या कामांचा विचार करणे.

संचालक मंडळाचे आदेशावरून

स्थळ : राजापूर
XXX

दिनांक : १४/०६/२०१९
**श्री.शेखरकुमार उत्तम अहिरे**
कार्यकारी संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी

टीप १) ठरलेल्या वेळेस सभेत गणपूर्ती न झाल्यास नोटीसीत नमूद केलेल्या ठिकाणी अर्ध्या तासानंतर वार्षिक साधारण सभा घेण्यात येईल व त्यास गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही. त्यात वरील विषयांचा विचार केला जाईल.

२) सन्मा.सभासदांना सदरचे अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रकासंबंधी काही माहिती वजा प्रश्न वार्षिक सभेत विचारावयाचे असतील त्यांनी तसे त्यांचे लेखी प्रश्न बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे दि.०९/०९/२०१९ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत बँकेच्या प्रधान कार्यालयात आणून द्यावेत.

३) बँकेचा ९८ वा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक बँकेच्या प्रधान कार्यालयासह सर्व शाखांमध्ये नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. तसेच rajapururbanbank.com या website वर प्रसिद्ध करण्यात आला आहे.

## ✦ ठेवींवरील आकर्षक व्याजदर ✦

**कायम ठेव व्याजदर**

| क्र. | कालावधी | व्याजदर |
|---|---|---|
| १) | १५ ते ४५ दिवस | ५.००% |
| २) | ४६ ते ९० दिवस | ५.५०% |
| ३) | ९१ ते १८० दिवस | ६.००% |
| ४) | १८१ ते १ वर्ष | ७.००% |
| ५) | १३ महिने ते २ वर्ष | ७.५०% |
| ६) | २५ महिने ते ३ वर्ष | ८.००% |
| ७) | ३७ महिन्यांपासून पुढे | ८.२५% |

**रिइन्व्हेस्टमेंट दर**

| क्र. | कालावधी | व्याजदर |
|---|---|---|
| १) | १५ महिने ते ३६ महिने | ७.७०% |
| २) | ३७ महिन्यांपासून पुढे | ८.००% |

**रिकरींग दर**

| क्र. | कालावधी | व्याजदर |
|---|---|---|
| १) | १ वर्ष | ७.५०% |
| २) | २ वर्ष | ८.००% |
| ३) | ३ वर्षांपासून पुढे वार्षिक | ८.२५% |

**टिप :-** १) ६० वर्षांवरील ठेवीदारास ०.५०% जादा व्याजदर
२) एकरकमी रु.२५ लाख ठेव ठेवणारास ०.५०% जादा व्याजदर
४) रिकरींग खाती वार्षिक मुदतीतच उघडणेची आहेत.
५) अनु.क्र.१ ते २ योजनेपैकी एकाच योजनेचा लाभ घेता येईल.

## ✦ आकर्षक कर्ज योजना ✦

- स्थावर मालमत्ता तारण कर्ज
- वाहन तारण कर्ज
- बँकेच्या मुदत ठेवीचे तारणावर कर्ज
- घरगुती गॅस खरेदीकरिता तातडीचे कर्ज
- महिलांकरिता गृहलक्ष्मी कर्ज
- वस्तू तारण कर्ज
- नॅशनल सेव्हिंग सर्टिफिकेट/विमा पॉलिसीचे तारणावर कर्ज
- कॅश-क्रेडिट कर्ज
- सोने ऐवज तारण कर्ज
- गृहोपयोगी/मशिनरी वस्तू खरेदीकरिता कर्ज
- घर बांधणी/घर दुरुस्ती कर्ज
- आकस्मिक कर्ज
- आंबा कॅश-क्रेडिट कर्ज
- पगारदार व बिगर पगारदार सभासदांना जामीनतारण कर्ज

## ✦ बँकेची ठळक वैशिष्ट्ये ✦

❖ राजापूरातील सर्वात जुनी व शतक महोत्सवाकडे यशस्वी घोडदौड करणारी बँक ❖ ISO ९००१ : २०१५ मानांकन प्राप्त बँक ❖ बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राज्य ❖ स्वत:चे डाटा सेंटर व सर्व शाखा संगणकीकृत ❖ कोअर बँकिंग सेवा ❖ ए.टी.एम./डेबिट कार्ड, मोबाईल बँकिंग सुविधा ❖ आर.टी.जी.एस./एन.ई.एफ.टी. सुविधा ❖ एस.एम.एस. अलर्ट, होस्ट टू होस्ट, आय.एम.पी.एस. सुविधा ❖ सी.टी.एस. २०१० चेकबुक सुविधा ❖ सातत्याने ऑडिट वर्ग 'अ', नेट एन.पी.ए. ०% असणारी बँक ❖ आधुनिक तंत्रज्ञानाचा जास्तीत जास्त वापर ❖ जेष्ठ नागरिकांसाठी घरपोच सेवा ❖ फिरती बँक (टॅब बँकिंग सुविधा) ❖ अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वैयक्तिक कर्ज, गट कर्ज व गट प्रकल्प कर्ज योजना ❖

# ३१ मार्च २०१९ अखेरची बँकेविषयी अधिक माहिती

## (DISCLOSURE OF INFORMATION)

(रुपये लाखात)

| अ.क्र. | तपशील | रक्कम | |
|---|---|---|---|
| १ | २ | ३१/०३/२०१८ | ३१/०३/२०१९ |
| १ | भांडवलाचे जोखीम असलेल्या जिंदगीशी किमान प्रमाण | १३.३०% | १२.६५% |
| २ | भांडवलाचे जोखीम असलेल्या जिंदगीशी असलेल्या किमान प्रमाणातील बदल | +०.२२% | -०.६५% |
| ३ | गुंतवणूक | | |
| | अ) पुस्तकी किंमत | ५,६३८.३२ | ५,१५०.६० |
| | ब) गुंतवणूकीचे दर्शनी किंमत | ५,४२५.०० | ५,१२५.०० |
| | क) बाजारी मुल्य | ५,५२६.१८ | ५,०७४.३९ |
| ४ | स्थावर मालमत्तेच्या तारणावर दिलेली कर्जे बांधकामासाठी व गृह कर्जे | १,४२२.०५ | २,०६४.७० |
| ५ | शेअर्स व डिबेंचर्सच्या तारणावर दिलेली कर्जे | ----- | ----- |
| ६ | संचालक, नातेवाईक, संबंधित कंपन्या/संस्थांना दिलेली कर्जे (संचालक म्हणून निवडून येण्यापूर्वीची) | | |
| | अ) निधी आधारित | ----- | ----- |
| | ब) गैरनिधी आधारित | ----- | ----- |
| ७ | ठेवीवरील खर्च (किंमत) - ठेवींचा सरासरी खर्च (किंमत) | ७.३५ | ६.९६ |
| ८ | उत्पन्न न देणाऱ्या जिंदगी | | |
| | अ) एकूण उत्पन्न न देणारी जिंदगी % Gross NPA | १.१६% | १.२०% |
| | ब) नक्त उत्पन्न न देणारी जिंदगी % Net NPA | ०% | ०% |
| ९ | उत्पन्न न देणाऱ्या जिंदगीमधील बदल | -०.१७ | + ०.०४ |
| १० | लाभ प्रदता | | |
| | व्याजाच्या उत्पन्नाचे कार्यशील निधीशी असलेले प्रमाण | ८.५८ | ८.६० |
| | व्याजाव्यतिरिक्त उत्पन्नाचे कार्यशील निधीशी असलेले प्रमाण | ०.४६ | ०.४० |
| | परिचालनात्मक लाभाचे (ऑपरेटिंग प्रॉफिट) कार्यशील निधीशी असलेले प्रमाण | ०.९२ | १.५२ |
| | जिंदगीवरील उत्पन्न | ०.३८ | ०.५३ |
| | प्रति कर्मचारी लाभ | १.९२ | २.७० |
| ११ | उत्पन्न न देणाऱ्या जिंदगीसाठी केलेली तरतूद,गुंतवणूक घसाऱ्यासाठी केलेली तरतूद दि.३१/०३/२०१९ अखेर नफा तोटा खात्याला खर्च टाकून गुंतवणूक घसारा निधी व चढउतार निधीला वर्ग केलेली | ५७.७२ | ०.०० |

# ३१ मार्च २०१९ अखेरची बँकेविषयी अधिक माहिती
## (DISCLOSURE OF INFORMATION)

(रुपये लाखात)

| अ.क्र. | तपशील | रक्कम | |
|---|---|---|---|
| १ | २ | ३१/०३/२०१८ | ३१/०३/२०१९ |
| १२ | तरतूदीमधील बदल | | |
| | अ) उत्पन्न न देणाऱ्या जिंदगीसाठी (NPA) | + ०.०० | + ३५.०० |
| | ब) गुंतवणूक घसाऱ्यासाठी | ----- | ----- |
| | क) सर्वसामान्य जिंदगीसाठी (Std.Assets) | + ७.०० | + १०.०० |
| १३ | विदेशी मुद्रा जिंदगी व येणी | ----- | ----- |
| १४ | गैरवैधानिकमध्ये समाविष्ट असलेली गुंतवणूक | ----- | ----- |

| क्र. | रोखे काढणाऱ्या संस्था | रक्कम | गुणवत्तापूर्ण गुंतवणूकीपेक्षा कमी दर्जाचे रोखे | गुणवत्ता दर्जा नसलेले रोखे | नोंदणी नसलेले रोखे |
|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम | ----- | ----- | ----- | ----- |
| २ | वित्तीय बँका | ----- | ----- | ----- | ----- |
| ३ | राष्ट्रीयकृत बँक | ----- | ----- | ----- | ----- |
| ४ | इतर वैधानिक तरलतेची गुंतवणूक | ----- | ----- | ----- | ----- |
| ५ | घसाऱ्यासाठी असलेली तरतूद | ----- | ----- | ----- | ----- |
| | एकूण | ----- | ----- | ----- | ----- |
| १५ | अनुत्पादित गैरवैधानिक गुंतवणूक | ----- | ----- | ----- | ----- |
| | आरंभीची शिल्लक | ----- | ----- | ----- | ----- |
| | १ एप्रिल २००७ नंतर झालेली वाढ | ----- | ----- | ----- | ----- |
| | चालू वर्षात झालेली घट | ----- | ----- | ----- | ----- |
| | वर्ष अखेरची शिल्लक | ----- | ----- | ----- | ----- |
| | एकूण असलेली तरतूद | ----- | ----- | ----- | ----- |
| | | | | March-18 | March-19 |
| १६ | ठेव विमा हप्ता भरल्याची तारीख | | | १९ मे २०१८ | १७ मे २०१९ |
| १७ | रिझर्व्ह बँकेने बँकेला केलेला दंड | | | निरंक | निरंक |
| १८ | पुर्नबांधणी मालमत्ता | | | निरंक | निरंक |

# ९८ वा वार्षिक अहवाल सन २०१९

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

सप्रेम नमस्कार,

**बँकेच्या संचालक मंडळाच्यावतीने आणि प्रशासनाच्यावतीने आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत करीत आहे. आपल्या बँकेच्या आर्थिक वर्ष सन २०१८-२०१९ चा ९८ वा वार्षिक अहवाल आपल्यासमोर सादर करताना आम्हांस मन:स्वी आनंद होत आहे. आम्हाला कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की, या आर्थिक वर्षात सहकारी बँक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या 'बँको' या सहकारी बँक संदर्भ ग्रंथ अग्रणी संस्थेकडून 'बँको' पुरस्कार सलग सहा वेळा प्राप्त झाले आहेत. 'बँकिंग फ्रंटियर्स' या सहकारी क्षेत्रातील अग्रगण्य संस्थेकडू 'बेस्ट सीईओ' पुरस्कार तसेच 'कर्नाडस् बँकिंग रिसर्च अँड डेव्हल्पमेंट फाऊंडेशन, कोल्हापूर' या संस्थेकडून 'सर्वोत्तम मुख्य कार्यकारी अधिकारी' हा पुरस्कार बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.शेखरकुमार अहिरे यांना प्राप्त झाला आहे, बँकेचे विशेष वसुली अधिकारी श्री.लक्ष्मण म्हात्रे यांना 'सर्वोत्तम विशेष वसुली अधिकारी' पुरस्कार याशिवाय आर्थिक सक्षम आणि उत्तम व्यवस्थापन असणारी बँक, शून्य टक्के निव्वळ एनपीए असणारी बँक व अद्ययावत संगणक सुविधा देणारी बँक असे एकूण पाच पुरस्कार महाराष्ट्रातील सहकारी बँकांमधून प्राप्त करण्याचा मान आपल्या बँकेने प्राप्त केला आहे. ही अभिमानास्पद बाब आहे.**

बँकेची आर्थिक प्रगती आणि संपन्नता यांच्याबरोबरच तळागाळातील प्रत्येक व्यक्तिच्या सर्वांगिण प्रगतीसाठी अथक प्रयत्न करणारी सहकारी क्षेत्रातील अग्रणी बँक असा नावलौकिक बँकेने निर्माण केला आहे. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. बदलत्या काळाचे आव्हान लक्षात घेऊन सहकारी बँकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्विकार करण्याची गरज आहे. अर्थव्यवस्था आणि समाज व्यवस्था यांची अनोखी सांगड घालून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत गुणवत्तापूर्ण कार्यक्षम व तत्पर ग्राहक सेवा यामुळेच दर्जेदार बँकिंगकडे बँकेची वाटचाल सुरु आहे व विश्वासार्ह बँकिंग सेवा देण्याच्या बँकेच्या प्रयत्नांना बँकेची उत्कृष्ट कर्ज वसुली व सर्व सेवा-सुविधा यामुळे यश आले आहे हे लक्षणीय आहे.

सर्वसाधारणपणे भारतीय अर्थव्यवस्था व बँकिंग उद्योग या क्षेत्रांमध्ये अनेक आव्हानांना नेहमीच सामोरे जावे लागत आहे. सर्वच संस्थांपुढे तीव्र स्पर्धेचे आणि खाजगी व्यापारी वर्गाचे मोठे आव्हान आहे. काळाची गरज लक्षात घेता व्यावसायिक पद्धतीने तोंड देण्यासाठी तसेच जलद गतीने वाढ करण्यासाठी, बँकिंग क्षेत्रात सक्षमपणे उभे राहण्यासाठी आपल्या संचालक मंडळाने वेळोवेळी धोरणात्मक निर्णय घेऊन व तंत्रज्ञानाच्या आधुनिकतेमुळे गुणवत्तापूर्वक व्यावसायिकता हा बाणा अंगीकारून आपली बँक निश्चितच प्रगतीपथावर नेण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत.

आपली बँक भारतीय रिझर्व्ह बँकेचे ''आर्थिकदृष्ट्या सशक्त व उत्तम व्यवस्थापनाचे (Financial Sound and Well Managed Bank) सर्व मानदंड पुर्ण करीत असून भांडवल पर्याप्तता प्रमाण १२.६५% इतके राखण्यात यश मिळाले आहे. बँकेचा सीडी रेशो योग्य प्रमाणात राखून नफाशिलतेत उत्तुंग वाढ झाल्याने राखीव व इतर निधीतही चांगली वाढ करण्यात आली आहे. बँकेच्या या सर्वांगीण प्रगतीत बँकेतील सर्व कर्मचारी,

अधिकारी वर्ग, व्यवस्थापकीय वर्ग, संचालक मंडळ तसेच भागधारक, खातेदार व हितचिंतक या सर्वांचा खूप मोठा महत्त्वाचा वाटा आहे. पुढील वर्षी याही पेक्षा अधिक व्यावसायिकता अंगिकारून प्राप्त परिस्थितीत अर्थपुर्ण व्यवसाय करण्याचे आव्हान नक्कीच आम्हासमोर असणार आहे. परंतु आपणा सर्वांचा बँकेवरील विश्वास भविष्याचा वेध घेणारे संचालक मंडळाचे धोरण व त्यानुसार बँकेच्या कर्मचाऱ्यांची सक्रिय साथ यामुळे कोणत्याही परिस्थितीत यश संपादन करून बँकेचे उज्वल भविष्य आणि प्रगती नक्कीच साधू असा आम्हांस पुर्ण विश्वास आहे. यासाठी आपणा सर्वांचे सहकार्य आणि सर्व प्रकारचे योगदान मिळेल अशी आम्हांला खात्री आहे. या पुढील वाटचालीतही आपणा सर्वांचे प्रेम, स्नेह सोबत आहेच त्याबद्दल संचालक मंडळाचेवतीने आपणा सर्वांचे खूप-खूप आभार !

आपल्या बँकेने आर्थिक वर्षात उल्लेखनीय केलेली प्रगती पुढीलप्रमाणे नमूद करताना मला मन:पूर्वक आनंद होत आहे.

**सभासद व भागभांडवल : रु.५,०७,४७,३६०/-**

बँकेचे अधिकृत भागभांडवल रुपये ५ कोटी वरून रुपये १० कोटी करण्याची शिफारस बँकेच्या मा.संचालक मंडळाने गत वर्षीच्या ९७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे पोटनियमाद्वारे मंजूरी देणात आली होती. त्याला महाराष्ट्र शासनाचे मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून दि. १६.१०.२०१८ रोजी मान्यता मिळाली आहे. त्यामुळे आता बँकेचे अधिकृत भागभांडवल १० कोटीचे असून ते आर्थिक वर्षात ५ कोटी ७ लाख इतके वसूल झाले आहे. बँकेच्या प्रगतीचा कणा म्हणजे सभासद होय. सभासदांचा वाढता विश्वास व बँकेच्या व्यवसायातील होत असलेली वाढ यामुळे भविष्यात बँकेच्या भागभांडवलात मोठ्या प्रमाणात वाढ होईल असा आम्हांला विश्वास आहे.

या आर्थिक वर्षाअखेर बँकेचे एकुण २२,७४९ सभासद आहेत. त्यात एकूण १७८ इतक्या सभासदांनी राजिनामा दिलेला असून १,४१५ इतके नवीन सभासद झालेले आहेत.

**भांडवल पर्याप्तता प्रमाण (CRAR) :**

रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार बँकेच्या भागभांडवल पर्याप्ततेच्या प्रमाणावर बँकेच्या संपूर्ण कामकाजाचे मुल्यमापन केले जाते. त्यानुसार रिझर्व्ह बँकेने बँकांचे भांडवल पर्याप्ततेचे प्रमाण हे किमान ९% इतके राखणे आवश्यक असताना आपल्या बँकेने भागभांडवल पर्याप्तता प्रमाण हे १२.६५% इतके राखलेले आहे. सदर भागभांडवल वाढीचा वेग हा बँकेच्या भक्कम आर्थिक परिस्थितीचे निर्देशक आहे.

**राखीव व इतर निधी : रु.११,९५,९१,८५८/-**

बँकेची सुरक्षितता व स्थैर्य राखीव व इतर निधीवर अवलंबून असते. बँकेचा आर्थिक पाया भक्कम होणेसाठी भागभांडवलाबरोबरच राखीव व इतर निधीची पुरेशी तरतूद असणे तितकेच महत्त्वाचे आहे. गतवर्षी बँकेचा राखीव व इतर निधी रु.१० कोटी ९२ लाख इतका होता. त्यामध्ये रु.१ कोटी ४ लाख इतकी वाढ झाली आहे.

**ठेवी : रु.२,१९,५४,११,०५६/-**

सभासद, खातेदार, ठेवीदार व हितचिंतक या सर्वांचा सक्रिय सहभाग व मोलाचा पाठिंबा व विश्वास हा बँकेकडे वाढ होत असलेल्या ठेवींवरून प्रामख्याने दिसून येत असतो. त्यामुळे बँकेकडील ठेवींना अनन्य

साधारण असे महत्त्व आहे. याठिकाणी विशेष नमुद करण्यास आनंद होतो की, बँकेच्या एकूण ठेवींमध्ये उत्तम प्रकारे एकूण रु. २९ कोटी ८८ लाख ठेव वाढ होऊन आर्थिक वर्षात बँकेच्या एकूण ठेवी रक्कम रु. २१९ कोटी ५४ लाख इतक्या झाल्या आहेत. बँकेच्या ठेव वाढीचे हे प्रमाण १५.७५% आहे. बँकेने मोबाईल बँकिंग व टॅब बँकिंग ही सुविधा सुरु केल्यामुळे बचत ठेव, चालू ठेव (कासा डिपॉझिट) यामध्ये ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद व पाठिंबा मिळाला आहे. त्यामुळे बँकेच्या कासा डिपॉझिटमध्ये उत्तम वाढ झालेली असून त्याचे प्रमाण २९.४७% इतके आहे.

ठेवीदारांच्या सुरक्षिततेसाठी बँक दरसाल सप्टेंबर व मार्च या सहामाही कालावधी अखेर डिपॉझिट इन्शुरन्स ॲण्ड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन या रिझर्व्ह बँकेच्या ठेव विमा विभागास प्रिमियमची रक्कम पाठवित असते. बँक विम्याचे हप्ते वेळेवर भरत असल्याची खात्री करून घेण्यासाठी आपल्याला सदर विभागाचा पत्ता, फोन नंबर, फॅक्स नंबरही माहितीसाठी देत आहोत. अहवाल वर्षात बँकेने खालीलप्रमाणे विम्याचे हप्ते पाठविले आहेत.

| विमा संरक्षण आकारणी पात्र ठेवी रुपये (लाखात) (Deposit Assessable) | विमा हप्त्याची रक्कम रुपये (With Service Tax) | रक्कम भरणा केल्याचा दिनांक | कोणते तारखेपर्यंत विमा संरक्षण प्राप्त आहे |
|---|---|---|---|
| १८,९६६.४३ | ११,४४,७२६.०० | १९.०५.२०१८ | ३०.०९.२०१८ |
| १९,३५६.४० | ११,६६,०३७.०० | ०९.११.२०१८ | ३१.०३.२०१९ |
| २२,३६०.७४ | १३,१९,२८२.०० | १७.०५.२०१९ | ३०.०९.२०१९ |

**डिपॉझिट इन्श्युरन्स ॲण्ड क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन**

रिझर्व्ह बँक बिल्डिंग, दुसरा मजला, मुंबई सेंट्रल रेल्वे स्टेशन समोर, भायखळा, मुंबई ८
दूरध्वनी (०२२) २३०८४१२१ फॅक्स नं. (०२२) २३०१८१६५
बेलापूर दूरध्वनी नं. (०२२) २७५७८०१२/१३ वेबसाईट : www.dicgc.gov.in

**ठेवी आणि कर्जाचा दहा वर्षांचा आढावा**



## कर्जे : रु.१,३०,९५,१६,५७०/-

आर्थिक वर्ष २०१८-१९ या अहवाल सालात आपल्या बँकेने दिलेल्या कर्जात २२.६६% इतकी भरीव वाढ होऊन रक्कम रु. १३०.९६ कोटींचा उंबरठा ओलांडला आहे. कर्ज व्यवहार हा बँकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. तरी देखील ग्राहकांच्या मुलभूत गरजा लक्षात घेऊन अन्य बँकांच्या व्याज दरांची तुलना करता न्यूनतम असे व्याजदर आकारून ग्राहकांना जास्तीत-जास्त सहज सुलभ कर्ज उपलब्ध व्हावे म्हणून संचालक मंडळाने नियमीत व आगाऊ हप्ते परतफेड करणाऱ्या कर्जदारांना व्याज सवलत योजना लागू केली आहे आणि त्याचा ग्राहकांना फायदा होत असून ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद लाभत आहे. कर्ज मंजूर करताना कर्जदाराची पत, परतफेडीची क्षमता व कर्जाची सुरक्षितता इत्यादी बाबी विचारात घेऊन अहवाल सालामध्ये बँकेने कर्जपुरवठा केला आहे. दि. ३१ मार्च २०१८ रोजी बँकेची कर्जे रु. १०६ कोटी ७६ लाख इतकी होती. अहवाल सालात २४ कोटी २० लाख वाढ झाली आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक निर्देशानुसार आवश्यक मर्यादेपेक्षा अधिक कर्ज आपल्या बँकेने अग्रगण्य घटकास (Priority Sector) व दुर्बल घटकास (Weaker Sector) वाटप केलेले आहे. तसेच बँकेने क्रेडिट इन्फॉर्मेशन ब्युरो इंडिया लि. (CIBIL) या पत मानांकन संस्थेचे सदस्यत्व प्राप्त करून घेतले असून या माध्यमातून कर्जदाराचे पत मानांकन अहवाल प्राप्त करून नंतरच कर्ज मंजूरीचे निर्णय घेण्यात येतात. या आर्थिक वर्षात आपल्या बँकेची ढोबळ अनुत्पादित कर्जे १.२०% इतके असून निव्वळ अनुत्पादित कर्जे ०% आहेत.

## दिनांक ३१-३-२०१९ अखेर संचालक मंडळ व नातेवाईक यांचे कर्जाची माहिती

(रक्कम रुपये लाखात)

| तपशील | वर्षाचे सुरुवातीला येणेबाकी | सह.वर्षात कर्जाऊ दिलेली | सह. वर्षात फेड केलेली | वर्ष अखेर बाकी | रकाना ४ मध्ये नमूद केलेल्या रकमेपैकी थकित रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १) संचालक | ३१.४७ (ठेवतारण) | ०.०० (ठेवतारण) | १.०९ (ठेवतारण) | ३०.३८ (ठेवतारण) | ०.०० |
| २) नातेवाईक | ०.०० (ठेवतारण) | ११.६४ (ठेवतारण) | ७.७३ (ठेवतारण) | ३.९१ (ठेवतारण) | ०.०० |
| तारणी कर्ज | ----- | ----- | ----- | ----- | ०.०० |

## बँकेच्या पंचवार्षिक सांपत्तिक स्थितीचा तुलनात्मक आढावा

(रक्कम रुपये लाखात)

| क्र. | तपशील | ३१-३-२०१५ | ३१-३-२०१६ | ३१-३-२०१७ | ३१-३-२०१८ | ३१-३-२०१९ |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कायम सभासद संख्या | १७,३७५ | १८,८९४ | १९,९५६ | २१,५१२ | २२,७४९ |
| २ | नाममात्र सभासद संख्या | ३,११५ | ३,५९० | ३,६८५ | ३,०१२ | २,९५७ |
| ३ | वसूल भाग भांडवल | २२१.८४ | २८४.७८ | ३३५.८७ | ४१८.१३ | ५०७.४७ |
| ४ | राखीव व इतर निधी | ७५०.४० | ८१४.५६ | ९४१.५८ | १,०९२.०२ | १,१९५.९२ |
| ५ | ठेवी | ११,५८१.०२ | १२,८२८.१६ | १५,५२५.३८ | १८,९६६.४३ | २१,९५४.११ |
| ६ | कर्जे | ६,८३८.४९ | ७,६७९.६१ | ८,८४०.७७ | १०,६७५.६१ | १३,०९५.१७ |
| ७ | गुंतवणूक | ४,४५६.०१ | ४,९४०.८८ | ६,८१६.२१ | ८,४२०.९० | ८,८००.६८ |
| ८ | थकबाकी | १.४५% | १.४८% | २.२५% | २.१२% | १.८६% |
| ९ | डिव्हिडंड | ११% | १०% | १०% | १०% | १०% |
| १० | नफा/तोटा | + ८५.३९ | + ६८.९५ | + १००.२५ | + ८०.७२ | + १२६.८९ |
| ११ | खेळते भांडवल | १२,९८४.५३ | १४,२६३.३५ | १७,४३९.८४ | २१,०५६.१८ | २४,१०४.८३ |
| १२ | ऑडिट वर्ग | अ | अ | अ | अ | अ |
| १३ | सीआरएआर | १४.९६% | १४.१०% | १३.०८% | १३.३०% | १२.६५% |
| १४ | एनपीए | ०% | ०% | ०% | ०% | ०% |

## शाखानिहाय आर्थिक स्थितीचा आढावा (३१ मार्च २०१९ अखेर)

(रक्कम रुपये लाखात)

| अ. क्र. | तपशील | मुख्य कार्यालय | राजापूर शाखा | सा.नाटे शाखा | पाचल शाखा | लांजा शाखा | रत्नागिरी शाखा | देवरूख शाखा | जा.पटार शाखा | वैभववाडी शाखा | कुडाळ शाखा | पडेल शाखा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठेवी | ----- | ९,३१२.४९ | १,४२४.२५ | १,६३४.३४ | ३,१९५.४३ | ३,०५३.५४ | ५८६.२५ | ६७०.५० | १,४४६.३१ | ३६३.३६ | २६७.६४ |
| २ | कर्जे | ----- | ३,३००.४० | ८१८.६० | ८०४.१३ | १,६०९.२९ | ३,०६४.०९ | ५८५.०७ | ४३३.०० | १,४५१.०५ | ७८६.९५ | २४२.५९ |
| ३ | उत्पन्न | ----- | १,१३०.६७ | २७०.०२ | ३८९.०७ | ३६४.५० | ४६५.३९ | १०६.७० | ७१.८५ | २०१.९५ | ९३.४२ | ७०.१२ |
| ४ | खर्च | ----- | ८९०.२३ | २१९.१३ | ३२५.४७ | २८९.३३ | ३५३.७० | १०२.४७ | ६१.४२ | १५२.३९ | ७८.७१ | ७४.३६ |
| ५ | नफा-तोटा | -२०६.३१ | १८५.७० | ५०.८९ | ६३.६१ | ७५.१७ | १११.६९ | ४.२३ | १०.४४ | ४९.५६ | १४.७१ | -४.१२ |
| ६ | थकबाकी | ----- | ५२.३६ | ३.६८ | ९.३८ | २६.३१ | ९६.४६ | ३८.९८ | ३.९८ | ८.५८ | २.०९ | २.६२ |
| ७ | थकबाकी % | ----- | १.५९ | ०.४५ | १.१७ | १.६३ | ३.१५ | ६.६६ | ०.९२ | ०.५९ | ०.२६ | १.०८ |

## तारण निहाय कर्जाचा तक्ता

(रक्कम रुपये लाखात)

| अ. क्र. | तपशील | येणे कर्ज | | | | एकूण येणे कर्जाशी प्रमाण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१७-२०१८ | | २०१८-२०१९ | | २०१७-१८ | २०१८-१९ |
| | | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | रक्कम | रक्कम |
| १ | व्यापारी मालतारण नजरगहाण | ११९ | ८३९.१० | १२४ | १,१८०.९४ | ७.८६ | ९.०२ |
| २ | इमारत व प्रॉपर्टी | ४४२ | ४,००४.४६ | ५२६ | ५,२८८.९९ | ३७.५१ | ४०.३९ |
| ३ | यंत्रसामुग्री | ३२ | २२.८३ | ५१ | २१.३४ | ०.२१ | ०.१६ |
| ४ | वाहने | ९५९ | १,५३२.४५ | १,१५० | २,१४२.८३ | १४.३६ | १६.३६ |
| ५ | सोनेतारण | ११,८०७ | २,९८५.९७ | ११,२६३ | ३,१००.९० | २७.९७ | २३.६८ |
| ६ | सरकारी कर्जरोखे | ५ | २.१२ | ५ | ५.१० | ०.०२ | ०.०४ |
| ७ | कंपनी शेअर्स/विमा | ७ | ६.६० | १२ | ८.९९ | ०.०६ | ०.०७ |
| ८ | भाडे खरेदी | २,९७८ | ६००.३८ | २,६४७ | ५७०.६३ | ५.६२ | ४.३६ |
| ९ | ठेव तारण | ४९१ | ६८१.७० | ५१३ | ७७५.४५ | ६.३९ | ५.९२ |
| | एकूण | १६,८४० | १०,६७५.६१ | १६,२९१ | १३,०९५.१७ | १००.०० | १००.०० |

## थकबाकीचा तपशील ३१-०३-२०१९

(रक्कम रुपये लाखात)

| मुदत | तारण | | तारणविरहित | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम |
| १ वर्षापर्यंत | १,१११ | १२८.१८ | ९२१ | ३.६७ | २,०३२ | १३१.८५ |
| १ ते २ वर्ष | ५ | ३२.३५ | २ | ०.२२ | ७ | ३२.५७ |
| २ ते ३ वर्ष | ३ | ६.०६ | ७ | ०.९२ | १० | ६.९८ |
| ३ ते ५ वर्ष | २ | ३६.९८ | ३ | ०.७० | ५ | ३७.६८ |
| ५ वर्षावरील | १३ | २९.२२ | १४ | ६.१४ | २७ | ३५.३६ |
| एकूण | १,१३४ | २३२.७९ | ९४७ | ११.६५ | २,०८१ | २४४.४४ |

## थकबाकीचे वर्गीकरण

| अ.क्र. | मुदत | एकूण थकबाकी रुपये | एकूण थकबाकीचे येणे कर्जाशी प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | १ वर्षाचे आतील | १,३१,८४,९८६.५० | १.०० |
| २ | १ ते २ वर्ष | ३२,५६,५३८.०० | ०.२५ |
| ३ | २ ते ३ वर्ष | ६,९८,१४१.०० | ०.०५ |
| ४ | ३ ते ५ वर्ष | ३७,६८,२१५.०० | ०.२९ |
| ५ | ५ वर्षावरील | ३५,३६,४१२.१५ | ०.२७ |
| | एकूण | २,४४,४४,२९२.६५ | १.८६ |

दिनांक ३१-०३-२०१९ अखेरीस प्रत्येक कर्जाच्या येणेबाकी, त्यातील थकबाकी व तिचे कर्जाशी प्रमाण खालीलप्रमाणे आहे.

### (अ) अल्पमुदत कर्जे :

| अ.क्र. | कर्जाचा प्रकार | येणे बाकी रुपये | पैकी थकित | शे.प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | कॅश-क्रेडिट जामीन | २४,१५७.७५ | २४,१५७.७५ | ०.०० |
| २ | कॅश-क्रेडिट नजरगहाण | १०,८९,५६,९३७.८६ | ५,७१,५४४.०० | ०.०४ |
| ३ | कॅश-क्रेडिट आंबा | ९१,१३,०६०.८२ | ०.०० | ०.०० |
| ४ | सोनेतारण | २९,०९,८४,३४८.७० | ०.०० | ०.०० |
| | एकूण | ४०,९०,७८,५०५.१३ | ५,९५,७०१.७५ | ०.०४ |

### (ब) मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे :

| क्र. | कर्जाचा प्रकार | येणे कर्ज रुपये | पैकी थकित रुपये | शे.प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | जामिनतारण (अंडरटेकिंगसह) | १,४३,०६,२२९.०० | १,७३,०९५.०० | ०.०१ |
| २ | जा.तारण (ई करारपत्र बोजा) | १,७८,५६,३८९.०० | ५,३४,९१५.०० | ०.०४ |
| ३ | जा.तारण-आकस्मिक कर्ज/गृहलक्ष्मी | २,४९,००,३३९.०० | ११,४१,२०८.०० | ०.०९ |
| ४ | घरबांधणी | २०,६४,७०,२९९.५० | २२,५५,७४३.५० | ०.१७ |
| ५ | स्थावर तारण | ३२,२४,२८,१०१.१० | १,५२,५७,८७९.४० | १.१६ |
| ६ | वाहन तारण | २१,४२,८२,५६२.६७ | ३९,०९,२१२.५० | ०.३० |
| ७ | वस्तुतारण | २१,३३,९४५.५० | ३,४२,७००.५० | ०.०३ |
| ८ | ठेवतारण | ७,७५,४४,५१३.०६ | ०.०० | ०.०० |
| ९ | नॅशनल सेव्हिंग्ज सर्टि. | ५,१०,३७१.०० | ०.०० | ०.०० |
| १० | विमा पॉलिसी | ८,९९,१८२.०० | ०.०० | ०.०० |
| ११ | सोनेतारण मुदत कर्ज | १,९१,०६,१३३.०० | २,३३,८३७.०० | ०.०२ |
| | एकूण | ९०,०४,३८,०६४.८३ | २,३८,४८,५९०.९० | १.८२ |

## लवाद दावे प्रकरणे माहिती खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | तपशील | दावे | रक्कम लाखात |
|---|---|---|---|
| १ | आरंभी शिल्लक | ३६ | ३७.०४ |
| २ | नवीन प्रकरणे | ४७ | ५६.१८ |
| ३ | या वर्षातील वसुली | ४० | २२.२४ |
| ४ | शिल्लक दावे | ४३ | ७०.९८ |

## गुंतवणूक : रु.८८,००,६७,५२३/-

बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ कलम १८ व २४ मधील तरतूदीस व रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकानुसार बँकेने गुंतवणुकीचे व्यवस्थापन केले आहे. बँकेने आपले गुंतवणूकीबाबतचे धोरण तयार केलेले आहे. मान्यताप्राप्त गुंतवणुकांमध्ये वेळोवेळी सजगपणे गुंतवणूक करत राहणे, त्यातून उत्तम व्याज परतावा मिळविणे याबाबत आपल्या बँकेची कामगिरी अतिशय उत्तम व समाधानकारक आहे. त्याचेच द्योतक म्हणून बँकेला विक्रमी असा रक्कम रु. २ कोटी ८२ लाख इतका ढोबळ नफा आर्थिक वर्षात बँकेने मिळविला आहे. गतवर्षी बँकेची गुंतवणूक ८४ कोटी २१ लाख होती. अहवाल सालात ३ कोटी ८० लाख इतकी वाढ झाली आहे.

## अनुत्पादित कर्जव्यवस्थापन :

रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार ढोबळ NPA प्रमाण ७% च्या आत असणे आवश्यक आहे. असे असताना

**अनुत्पादित कर्जाचा टक्केवारीनुसार आढावा**



आर्थिक वर्षात बँकचे ढोबळ NPAचे प्रमाण १.२०% इतके असून बँकेच्या नक्त NPAचे प्रमाण हे ०% राखण्यात गेली ९ वर्षे सातत्याने यश संपादन केले आहे. कर्जदारांना कळकळीची विनंती आहे की, त्यांनी आपली कर्जखाती NPAमध्ये जाणार नाहीत याबाबत सतर्क रहावे व बँकेला सहकार्य करावे.

**नफा विभागणी :**

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व महाराष्ट्र राज्य सहकारी अधिनियम १९६० तरतूदीस अनुसरून अहवाल सालामध्ये बँकेला एकूण ढोबळ नफा रु.२,८२,५५,१३८.२३ इतका झाला असून त्यामधून पुढीलप्रमाणे तरतूदींना संचालक मंडळाने मंजूरी दिली आहे.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | शिल्लक रजा निधी | २०,००,०००.०० |
| २ | ऑडिट फी | ७,००,०००.०० |
| ३ | बोनस/इन्सेंटिव्ह | २०,००,०००.०० |
| ४ | उत्तम जिंदगी | १०,००,०००.०० |
| ५ | संशयीत बुडित कर्ज निधी | ३५,००,०००.०० |
| | एकूण | ९२,००,०००.०० |

वरीलप्रमाणे आवश्यक त्या तरतूदी केल्यानंतर निव्वळ नफा रु.१,२६,८९,१०५.२३ झाला असून नफ्याची विभागणी व लाभांशाची संचालक मंडळाने पुढीलप्रमाणे शिफारस केली आहे त्यास स्विकृती द्यावी.

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| १ | राखीव निधी २५% | ३१,७२,२७६.०० |
| २ | लाभांश समिकरण निधी २% | २,५३,७८२.०० |
| ३ | जादा राखीव निधी १०% | १२,६८,९११.०० |
| ४ | लाभांश १०% सूचित | ४५,००,०००.०० |
| ५ | धर्मादाय निधी १% | १,२६,८९१.०० |
| ६ | शतक महोत्सवी निधी | २,००,०००.०० |
| ७ | निवडणूक निधी | २,००,०००.०० |
| ८ | सभासद कल्याण निधी | १,००,०००.०० |
| ९ | कर्मचारी/संचालक/सभासद प्रशिक्षण निधी | १,००,०००.०० |
| १० | गुंतवणूक चढ-उतार निधी | १३,००,०००.०० |
| ११ | इमारत निधी | १४,६७,२००.०० |
| १२ | शिल्लक नफा | ४५,२३ |
| | एकूण | १,२६,८९,१०५.२३ |

## लाभांश :

आम्हांला आनंद होत आहे की, आपल्या बँकेच्या संचालक मंडळाने सन २०१८-१९साठी १०% लाभांश देण्याची शिफारस केलेली असून त्याला मा.सभासदांची मान्यता मिळणेसाठी नम्र विनंती आहे. मंजूर लाभांशाची रक्कम ज्या सभासदांचे भागभांडवल रुपये १,०००/- पेक्षा कमी आहे अशा सभासदांनी सदर लाभांशाची रक्कम शेअर्स खाती वर्ग करावी व आपले भागभांडवल नियमानुसार किमान रुपये १,०००/- करावे अशी विनंती संचालक मंडळाचे वतीने करण्यात येत आहे.

## आधुनिक तंत्रज्ञान :

सध्याचा काळ हा डिजीटल बँकिंगचा असल्यामुळे बँकेचे ग्राहक आता आधुनिक सेवा-सुविधा जसे की, एटीएम, मोबाईल बँकिंगचा वापर मोठ्या प्रमाणावर करीत आहेत. आपली बँक तंत्रज्ञानाची दमदार धोरणे स्विकारून ग्राहकांकरीता पुढीलप्रमाणे आधुनिक बँकिंगच्या सर्व सेवा-सुविधा पुरवित आहे व त्याला ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

## डिजीटल बँकिंग सेवा :

१) मोबाईल प्रणाली - बँकेने मोबाईल सेवा सुरू केल्यापासून स्मार्ट फोन धारक ग्राहकांमध्ये अल्पावधीतच लोकप्रिय ठरली आहे. कारण त्यामध्ये विविध प्रगत सेवांचा समावेश करण्यात आलेला आहे. उदा. बँकेतील खात्यांमधील निधी हस्तांतर, आय.एम.पी.एस., आर.टी.जी.एस., एन.ई.एफ.टी. सेवा तसेच विविध बँकिंग सेवा, शिल्लक रक्कम व खाते उतारा चौकशी, चेकबुक मागणी इत्यादी.

२) एन.एफ.एस.नेटवर्क अंतर्गत बँक संपूर्ण भारतात ए.टी.एम. व पी.ओ.एस. सेवा देत आहे. त्याचबरोबर ग्राहकांना एस.एम.एस.बँकिंग, बील पेमेंट, ई-कॉमर्स अशा सेवा देत आहे.

३) टॅब बँकिंगद्वारे 'बँक आपल्या दारी' या योजनेअंतर्गत १० शाखांच्या अंतर्गत येणाऱ्या ग्रामीण भागातील ग्राहकांसाठी विशेष सेवा-सुविधा सुरु करण्यात आली आहे.

४) बँकेने खात्याच्या शिल्लक रक्कम मिसकॉल देऊन उपलब्ध करून देण्याची सुविधा सुरू केली आहे.

५) बँकेने आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे जेष्ठ नागरिकांना घरपोच बँकिंग सुविधा उपलब्ध करून देण्याची व्यवस्थाही सुरू केली असून त्याला ग्राहकांकडून उत्तम प्रतिसाद मिळून ही सुविधा अल्पावधीत लोकप्रिय झाली आहे. त्याचबरोबर आम्ही आश्वासन देऊ इच्छितो की, बँक सर्वोत्कृष्ट सेवेद्वारे आपण यशस्वी होण्यासाठी योगदान देऊन आपल्या व बँकेच्या यशोगाथांमध्ये अभिमानाने भागिदार होऊ इच्छिते.

## अंतर्गत नियंत्रण :

आपल्या बँकेने मुख्य कार्यालयामध्ये व्हिडीओ कॉन्फरन्सींग प्रणालीची सुविधा सुरू केलेली असून सदर प्रणालीद्वारे बँकेच्या शाखा कार्यालयातील अधिकारी प्रत्यक्ष प्रवास न करता व्हिडीओ कॉन्फरन्स कॉलद्वारे एकमेकांशी थेट संपर्क होत असतो. तसेच प्रधान कार्यालयातील कर्मचाऱ्यांशी शाखांमधून थेट संवाद साधता येत असल्याने ग्राहकांना आपल्या शंकांचे निरसन व समाधान करणे सोपे झाले आहे. त्यामुळे वेळेची बचत होऊन कार्यतत्परता वाढली आहे व बँक देत असलेल्या सेवेबाबत निवडक ग्राहकांकडून खातरजमा करून सूचना व

अभिप्राय घेण्याच्या पध्दतीमुळे कामकाज सहज सुलभ झाले आहे. बँकेचा कर्ज पुरवठा उत्पादक स्वरूपाचा रहावा यासाठी रिझर्व्ह बँक यांनी बँकिंग व्यवसायातील जोखीमा ओळखून सदर जोखीमा कमी करण्यासाठी जोखीम व्यवस्थापन धोरण अवलंबणेबाबत मार्गदर्शक सूचना केल्या आहेत. त्याप्रमाणे बँकेच्या व्यवहारातील विविध प्रकारच्या जोखीमा शोधून त्या कमी करण्यासाठी बँकेचे लेखापरिक्षण व अंतर्गत तपासणी विभागात सूक्ष्म व अनुभवी अधिकाऱ्यांचा समावेश केला आहे. मुख्य कार्यालय व दहा शाखांमध्ये अनुभवी चार्टर्ड अकाऊंटंस्‌द्वारे सतत व समवर्ती लेखापरिक्षण केले जात आहे. संचालक मंडळाची लेखापरिक्षण समिती विविध लेखापरिक्षण व तपासण्यांबाबत देखरेख करीत असते. तसेच लेखापरिक्षणाचे कार्य अधिक प्रभावी करण्यासाठी समिती सातत्याने प्रयत्नशील आहे. आपल्या बँकेची माहिती व तंत्रज्ञान संबंधीत लेखापरिक्षण (आय.एस.ऑडिट) आय.टी. क्षेत्रातील विविध धोके टाळण्यासाठी व माहिती तंत्रज्ञानाच्या चांगल्या व्यवस्थापनासाठी केले जाते.

### आंतरराष्ट्रीय दर्जा प्रमाण पत्र (ISO : 9001-2015 मानांकन) :

बँकेचे दैनंदिन बँकिंग कामाचे मुल्यमापन 'क्वालेटी मॅनेजमेंट सिस्टीम' बाबत मुख्य कार्यालयासह सर्व शाखांचे आय.एस.ओ. ऑडिट टी.यु.व्ही. इंडिया प्रा.लि. या कंपनीने केलेले असून ऑडिटमध्ये प्रामुख्याने बँकेच्या विविध ग्राहक सेवा, कर्ज व ठेव योजना, इतर दैनंदिन बँकिंग व्यवहार कोणत्या पध्दतीने होत असतात यासाठी निश्चित केलेली कार्यपध्दती सर्व शाखांमधून एकसारखे पणाने व नियमीतपणे होते का ? तसेच मुख्यकार्यालयाकडून पाठविण्यात येणाऱ्या सूचनांचे सर्व शाखा पातळींवरचे नियोजन व कार्यपध्दती इत्यादीची पहाणी केली जाते. या तपासणीमध्ये बँकेमार्फत देण्यात येणाऱ्या विविध सेवा-सुविधांची माहिती ग्राहकांकडूनसुध्दा खातरजमा करून घेतल्या नंतरच आय.एस.ओ. मानांकन ISO : 9001-2015 हे आंतरराष्ट्रीय दर्जा प्रमाणपत्र मिळालेले आहे. त्यामुळे बँकेने आपला गुणवत्ता दर्जा उत्तम राखला आहे.

### लेखापरिक्षण व तपासणी :

सन २०१८-१९ या संपलेल्या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षण (Statutory Audit) श्री.निलेश नंदकुमार पाटणकर - चार्टर्ड अकाऊंटंट, राजापूर यांनी केले असून गेल्या अनेक वर्षांप्रमाणे आपल्या बँकेला या ही वर्षी ऑडिट वर्ग **'अ'** मिळाला आहे. तसेच रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार बँकेचे आर्थिक वर्ष २०१८-१९ साठी सतत व समावर्ती लेखापरिक्षण श्री.साईप्रसाद एस.शेट्ये ॲण्ड कंपनी - चार्टर्ड अकाऊंटंट, खारेपाटण, दिपाली पुरुषोत्तम पाध्ये आणि कंपनी - चार्टर्ड अकाऊंटंट, रत्नागिरी यांनी केले आहे. तसेच संगणक कार्यप्रणाली लेखापरिक्षण गोगटे ॲण्ड कंपनी - चार्टर्ड अकाऊंटंट, कोल्हापूर यांनी करून बँकेच्या कामकाजावर नियंत्रण ठेवले आहे.

बँकेचे मा.वैधानिक लेखापरिक्षक, मा.अंतर्गत लेखापरिक्षक यांनी बँकेच्या कामकाजाबद्दल होत असलेल्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

### संचालक मंडळ :

बँकेच्या संचालक मंडळात निरनिराळ्या क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी व्यक्ती कार्यरत आहेत. त्यांच्या ज्ञानाचा तसेच अनुभवाचा चांगला उपयोग होत आहे. बँकेचे संचालक मंडळ सदस्य नियमीतपणे सभेत व बँकेत उपस्थित

